परिपत्रक

९२८

जा.क्र.राखते/गुनि३-४/बांधावर खत/ /१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४०० ००१ दि. १८/३/ २०१५

प्रति,

१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)

२. कृषि विकास अधिकारी,
जिल्हा परिषद, _______________ (सर्व)

**विषय : सन २०१५-१६ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांसाठी कृषि विभागामार्फत बांधावर खत वाटप उपक्रम राबविणे बाबत.....**

ऐन पेरणीच्या वेळी विशेषत: खरीप हंगामात एकाच वेळी रासायनिक खतांची मोठया प्रमाणात मागणी वाढते व मागणी प्रमाणे शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा पुरवठा होत नाही. त्यामुळे राज्याच्या काही भागात शेतकऱ्यांना खत टंचाईस सामोरे जावे लागते. तसेच एकाच वेळी मोठया प्रमाणांवर खताची मागणी वाढल्यामुळे खत वितरणामध्ये अडचणी निर्माण होतात. वाढती मागणी व मर्यादित खत पुरवठा याचा गैरफायदा घेऊन काही खत विक्रेत्यांकडून शेतक-यांची अडवणूक केली जाते, त्याचबरोबर खतांची चढ्या भावाने विक्री केली जाते, खतांच्या सोबत इतर अनावश्यक निविष्ठांची शेतक-यांना सक्तीने विक्री केली जाते, खतांची साठेबाजी केली जाते, तर काही ठिकाणी खताचा काळाबाजार होतो. या सर्व परिस्थितीमुळे शेतक-यांमध्ये असंतोष निर्माण होतो. त्यामुळे राज्यात काही ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न सुध्दा निर्माण झालेला होता.

शेतकऱ्यांना त्यांच्या मागणी नुसार, रास्त दराने व वेळेवर खत पुरवठा होण्याच्या दृष्टीने राज्यात खरीप हंगाम २०१२ पासून प्रत्येक जिल्हयात शेतकऱ्यांच्या बांधावर रासायनिक खत वितरणाचा उपक्रम यशस्वीरीत्या राबविला आहे. सदर कार्यक्रम अतिशय प्रभावी ठरला असल्याचे व त्यायोगे शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्धता झाल्याने शेतकऱ्यांच्या तक्रारी कमी होण्यास मदत झाल्याचे दिसून आले आहे.

खरीप हंगाम २०१२ मध्ये राबविलेल्या खत वितरणाच्या कार्यक्रमाच्या धर्तीवर राज्यात खरीप हंगाम २०१५ मध्ये देखील अशा पध्दतीने शेतकऱ्यांना बांधावर जास्तीत जास्त खत वाटप कार्यक्रम राबविणे बाबत मा. मंत्री, कृषि व पणन यांनी निर्देश दिलेले आहेत. या सर्व बाबींचा विचार करून मा. मंत्री महोदयांच्या सुचनांनुसार खरीप हंगाम २०१५ मध्ये बांधावर खत वाटप उपक्रम राबवितांना खालील बाबी विचारात घ्याव्यात.

सदरची योजना ही महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या., दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन (मार्कफेड) व विदर्भ को-ऑप. मार्केटींग फेडरेशन मर्या. नागपुर या पुरवठादार संस्थामार्फत राबवायची आहे.

**१) <u>शेतकरी गट स्थापना करणे</u> -**

रासायनिक खतांचे वाटप शेतकऱ्यांच्या बांधावर करण्यासाठी सद्यस्थितीत विविध योजनांतर्गत स्थापन केलेल्या व अस्तित्वात असलेल्या सर्व शेतकरी गटांचा समावेश करावा. बांधावर जास्तीत जास्त खत वाटप करण्यासाठी गावातील सर्व खातेदारांचे विविध गट स्थापन करणे आवश्यक राहील. त्यासाठी कोणत्याही नोंदणीची आवश्यकता राहणार नाही. खते मागणी व वाहतुकीच्या दृष्टीने गटातील शेतकरी सभासदांची संख्या १० किंवा त्यापेक्षा जास्त असावी.

**२) <u>खत पुरवठयाचे नियोजन करण्यासाठी बैठका आयोजित करणे.</u>**

गावनिहाय आवश्यक असणारी खत मागणी निश्चित करताना या कार्यक्रमाला विविध प्रसार माध्यमातून जिल्हा व तालुका स्तरावरुन मोठया प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात यावी. यासाठी तालुका स्तरीय अधिकारी व जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांनी हंगामपूर्व त्या त्या स्तरावर बैठका आयोजित करुन संबंधित लोकप्रतिनिधींना ही योजना समजावून दयावी. खत पुरवठा करणाऱ्या कंपन्या आणि खत वितरण करणा-या यंत्रणा यांना सभेसाठी बोलवावे. त्याचबरोबर जिल्हाधिकारी

यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या जिल्हा स्तरीय समन्वय सभेमध्ये याबाबत सविस्तर चर्चा करुन तालुका व गावनिहाय खत वितरणाबाबत रुपरेषा ठरवावी.

**३) गावनिहाय/गटनिहाय खताची मागणी निश्चीत करणे.**

वेळेवर खत मिळण्यासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्यांनी १५ दिवस अगोदर पुरवठादार संस्थेकडे गटाची मागणी नोंदविणे आवश्यक आहे.

अ) प्रथम ग्राम पातळीवरील कृषि सहाय्यकाने किंवा कृषि पर्यवेक्षकाने संबंधीत गटातील सदस्यांची चर्चा करुन आवश्यक असलेल्या खतप्रकारनिहाय मागणी निश्चित करावी. मागणी निश्चित करतांना एकाच प्रकारच्या खताची वाहतुकीच्या सोईच्या दृष्टीने किमान एक ट्रक लोड ( १० ते १२ मे.टन) मागणी नोंदवावी. खताची मागणी विशीष्ट कंपन्यांचा खताचा आग्रह न धरता ग्रेडचा विचार करुन मागणी नोंदवावी.

ब) मंडळ कृषि अधिकारी यांनी पुरवठादार संस्थेशी संपर्क साधून बचत गटास आवश्यक असलेल्या खताचे द' व उपलब्धता या बाबतची माहिती घेऊन, त्याप्रमाणे बचत गटास पुरवठादार संस्थेच्या नावे धनाकर्ष काढण्याबाबत कळवावे.

क) बचत गटाने मंडळ कृषि अधिकारी यांचे सुचनेनुसार आवश्यक त्या रकमेचा धनाकर्ष पुरवठादार संस्थेच्या नावे काढावा.

ड) मंडळ कृषि अधिकारी यांनी बचत गटाची मागणी व धनाकर्ष तालुका कृषि अधिकारी यांचे मार्फत पुरवठादार संस्थेकडे देण्यात यावा व मागणीची प्रत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी यांना देण्यात यावी. मागणी देतांना त्या संबंधित गटाच्या शेतकऱ्यांची यादी, गट प्रमुखाचा भ्रमणदुरध्वनी/ संपर्क क्रमांक व त्यांना आवश्यक असणा-या खतप्रकाराची माहिती दयावी.

त्यानंतर संबंधित गावाच्या कृषि सहाय्यकाने, मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या मार्फत संबंधित यंत्रणेकडे त्या गावास प्राधान्याने खत पुरवठा करण्याच्या दृष्टीने पाठपुरावा करावा. संबंधित यंत्रणेने खत पुरवठादार कंपनीद्वारा एकत्रित स्वरुपात खत वाहतूक करुन त्या गावातील शेतक-यांना त्यांच्या मागणीनुसार खताचे वितरण वेळेत करावे. ही कार्यवाही करीत असतांना शेतक-यांचे पैसे जमा करणे, त्यांचे धनादेश तयार करुन संबंधित यंत्रणेकडे पाठविणे इत्यादी सर्व आर्थिक व्यवहाराची कामे त्या-त्या गटाच्या प्रमुखांनी करावीत आणि त्यासाठी केवळ मार्गदर्शन करण्याचे काम क्षेत्रीय अधिकारी/कर्मचा-यांनी करावे. क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांनी कोणत्याही प्रकारे शेतक-यांकडून पैसे जमा करण्याचे व आर्थिक व्यवहाराचे काम करु नये, मात्र शेतक-यांना गटामार्फत संबंधित यंत्रणेकडून खत मिळवून देण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न व मार्गदर्शन करावे.

**४) खत पुरवठा करण्याची कार्यपद्धती**

पुरवठादार यंत्रणेने कोणत्या कंपनीस खत पुरवठयाची मागणी नोंदविलेली आहे त्याची प्रत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी जि.प. यांना दयावी. संबंधीत कंपनीने एफओआर पोहोच तत्वावर प्रथम प्राधान्याने संबंधीत गटास खताचा पुरवठा करावा. याबाबतचे सनियंत्रण कृषि विकास अधिकारी जि.प. यांनी करावे. याबाबत कोणतीही अडचण आल्यास ती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पुरवठादार यंत्रणा, पुरवठादार कंपनी व बचत गट यांचे सहमताने सोडविण्यात यावी. पुरवठादार संस्थेने संबंधीत कंपनीद्वारा गटाची मागणी असलेल्या खताची पुर्तता करावी. खत पुरवठा करण्याच्यावेळी पुरवठादार संस्थांनी खतांचा ट्रक भरल्यानंतर गट प्रमुखांशी संपर्क साधून खतांचा ट्रक थेट गावामध्ये/बांधावर पाठविण्यात यावा. ट्रक सोबत ज्या गटास खत दयावयाचे आहे त्या गटाचे नाव, गट प्रमुखाचे नाव, त्यांचा भ्रमणदुरध्वनी क्रमांक, रासायनिक खतांची ग्रेड व पोहोच करण्याचे ठिकाण इत्यादी बाबतची माहिती दयावी. सदर खताचे वाटप त्या गटातील सदस्यांना त्या गावातील कृषि कर्मचारी, गावामधिल विविध पदाधिकारी यांचे समक्ष करण्यात यावे. खताचा ट्रक गावात पोहचल्यानंतर गटातील सर्व संबंधीत सदस्य उपस्थित राहतील या बाबतचे नियोजन क्षेत्रीय कर्मचारी यांनी करावे. खताची उतराई संबंधीत शेतकरी गटाच्या सदस्यांनी खत स्वत: उतरुन गावातील एकाच ठिकाणी उतरावे व त्याचे यादीप्रमाणे आपआपले वाटप करुन घ्यावे.

वरीलप्रमाणे बांधावर खतवाटप कार्यक्रमाबाबत सविस्तर कार्यवाही बरोबरच खालील सुचनांचे अनुपालन संबंधीत यंत्रणांनी करावे.

- जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील खत पुरवठा सनियंत्रण समितीमार्फत खत पुरवठा व नियोजन याबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. त्यानुसार या उपक्रमांतर्गत येणाऱ्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने शेतकरी गटांना, यंत्रणांना मार्गदर्शन करावे.
- बांधावर खत वाटप योजनेच्या सनियंत्रणाची जबाबदारी पुरवठादार यंत्रणा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी या स्तरावर जबाबदार अधिकारी नेमुन त्याचा संपर्क क्रमांक या सर्व परस्पर समन्वय यंत्रणेकडे देण्यात यावा. बचत गटाची मागणी व पुरवठा संदर्भात या अधिकाऱ्याकडेच विचारणा करावी. बांधावर खत वाटप पुरवठाबाबतचा अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांचे मार्फत कृषि आयुक्तालयास सादर करावा.
- जिल्ह्यात खरीप हंगाम २०१५ मध्ये पुरवठा केली जाणारी जास्तीत जास्त रासायनिक खते बांधावर खत वाटप या उपक्रमातूनच शेतकऱ्यांना वितरीत केली जावीत.
- विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत स्थापन केलेल्या शेतकरी गटांना व नव्याने स्थापन करण्यात आलेल्या सर्व गटांना थेट खत वितरण कार्यक्रमाची रुपरेषा हंगामापुर्वीच ठरविण्यात यावी.
- कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या विवीध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत लाभार्थी शेतक-यांनी एकत्रीत मागणी केल्यास सदर उपक्रमांतर्गत खतपुरवठा करण्यास हरकत नाही.
- शेतकऱ्यांना बांधावर खत वाटपाचा कार्यक्रम स्थानिक **लोक प्रतिनिधींच्या समक्ष** आयोजीत करावा, तसे शक्य न झाल्यास याबाबत संबंधीत लोक प्रतिनिधींना अवगत करण्यात यावे. या उपक्रमास विविध प्रसार माध्यमातून व्यापक प्रसिद्धी द्यावी.

**बांधावर खत वाटप उपक्रमांमुळे खालील प्रमाणे फायदे होतात, हे सिध्द झाले आहे.**

**अ)** शेतकऱ्यांना वेळेवर, मागणी प्रमाणे व रास्त दराने खत पुरवठा होतो.

**ब)** खत कंपन्या / विक्रेते यांचे कडून शेतकऱ्यांची अडवणूक होत नाही.

**क)** खताच्या सोबत इतर अनावश्यक निविष्ठांची सक्तीने केल्या जाणाऱ्या विक्रीस पायबंद घातला जातो.

**ड)** लोक प्रतिनिधींना विश्वासात घेतल्याने शासनाची व कृषि विभागाची भुमिका पारदर्शक व कार्यक्षम होवून शेतकऱ्यांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण होते. पर्यायाने, शासनाची तसेच कृषि विभागाची प्रतिमा उंचावते.

उपरोक्त सुचनांचे काटेकोर पालन करुन खत वाटपाचा गटनिहाय उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात यावा व येत्या खरीप हंगाम २०१५ मध्ये शेतकऱ्यांना त्यांचे मागणीप्रमाणे वेळेवर व रास्त भावात खत पुरवठा होईल, असे पहावे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा विहित प्रपत्रातील साप्ताहीक अहवाल विभागीय कृषि सहसंचालक यांनी दर सोमवारी कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**कृषि संचालक (निवगुनि)**
**कृषि आयुक्तालय,म.रा.पुणे-१**

**प्रतिलिपी : माहितीसाठी**

**१.विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)**

**प्रत, माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.**

1. **महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.कृषि उदयोग भवन, दिनकरराव देसाई मार्ग, आरे कॉलनी गोरेगाव पुर्व मुंबई - ४०००६५**
2. **दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन (मार्कफेड), कनमूर हाउस, नरसी नाथा पीओ बॉक्स नं. ५०८० मज्जित बंदर, मुंबई - ४००००९**
3. **विदर्भ को-ऑप. मार्केटींग फेडरेशन मर्या. नागपुर.**